# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी, ४१३७२२, जि.- अहमदनगर

फोन :- ०२४२६-२४३३७४ e-mail :- comptroller.mpkv@gov.in


नियंत्रक अत्यंत महत्त्वाचे जा.क्र.नियंत्रक/परित्रक/ ८२२/२०१९
दि. १४ /०१/२०१९

## -: परिपत्रक :-

**विषय :-** आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यापीठ महसूली उत्पन्न व शासनाचे वेतनेतर अनुदानातील खर्च मंजूरीबाबत...

**संदर्भ :-**
१. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. जा.क्र.नियंत्रक/परित्रक/१०७/२०१८ दि. १८/०५/२०१८
२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.नियंत्रक/लेखा-२/अनुदान वितरण २०१८-१९/७४७/२०१८, दि. २६/११/२०१८

विद्यापीठाचे स्व-उत्पन्न, राज्य शासनाचे वेतनेतर अनुदान, भाकृअप योजनांमधील Contingency Grants यांमध्ये अपेक्षित वाढ होत नसल्यामुळे (किंबहूना घट होत असल्याने) विविध कार्यालयांचा कार्यालयीन खर्च, मालमत्तांची दुरुस्ती-देखभाल आदिसांठी मागणीप्रमाणे निधी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. त्यामुळे अत्यावश्यक व अपरिहार्य खर्च प्राधान्याने भागविणेसाठी बाबनिहाय खर्च नियोजन आवश्यक आहे. तसेच, खर्चात काटकसर करणे अटळ आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ०१ नुसार अत्यावश्यक १६ बाबींवरील खर्चाची देयके पारित करणेविषयी कळविण्यात आलेले होते.

संदर्भ क्र. ०२ नुसार अत्यावश्यक १६ बाबींसह अन्य कार्यालयीन खर्चासाठी, सन २०१८-१९ करीता राज्य शासनाकडून प्राप्त होणारे सहाय्यक अनुदान (वेतनेतर) व विद्यापीठ महसूली निधीतून अनुदान एकत्रितपणे वितरित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की,

संदर्भ क्र. ०२ नुसार सन २०१८-१९ अखेरपर्यंत विहीत १६ अत्यावश्यक बाबी आणि त्यासह 'प्रवास भत्ता देयके', या १७ बाबींवरील देयके महसूली उत्पन्न व आकस्मिक खर्च निधीमधून खर्च करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. ज्या कार्यालयांचे संपूर्ण उत्पन्न विद्यापीठ महसूली निधीमध्ये (University Revenue Receipts) जमा करण्यात येते, अशा कार्यालयांची 'मजूरी' शिर्षाखालील देयके पारीत करण्यात यावीत.

ज्या कार्यालयांचे संपूर्ण उत्पन्न विद्यापीठ महसूली उत्पन्न निधीमध्ये जमा होत नाही, अशा कार्यालयांना 'मजूरी' या बाबीवरील खर्चासाठी विषयांकित निधींमधून अनुदान उपलब्ध

कृ.मा.प.

करता येणार नाही, त्यांची देयके त्या-त्या योजनांकरीता स्थापित केलेल्या फिरता निधी अथवा त्यांच्या अन्य स्त्रोतांमधून भागविण्यात यावीत.

२. ज्या कार्यालयांनी चल व अचल वस्तू (Movable & Immovable Assets) सह Balance Sheet विषयक माहिती या कार्यालयास सादर केलेली आहे, अशाच कार्यालयांची प्रवास भत्ता देयके मंजूर करण्यात यावीत. अशा कार्यालयांची यादी सोबत जोडली आहे.

त्यात प्राधान्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रवासभत्ता/ बदली प्रवासभत्ता देयके आणि इतरांची माहे मार्च २०१८ अखेरची प्रलंबित प्रवासभत्ता देयके द्यावीत.

३. ज्या कार्यालयांचा विषयांकित निधींमधून मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा अधिकचा खर्च त्यांचेकडील उत्पादके चाचणी/ फिरता निधी/ स्वयंसहायता निधीमधून करण्यात आलेला व येत आहे, असा खर्च विषयांकित निधींमधून समायोजित करु नये. म्हणजेच कोणताही निधी महसूली उत्पन्न निधी अथवा राज्य शासनाच्या आकस्मिक निधीतून फिरता निधी वा अन्य निधींकडे वळवू (परतावा घेवू) नये.

अधिदान व लेखा अधिकारी यांना वरीलप्रमाणे खर्चाच्या १७ बाबींची देयके पारीत करण्यासाठी, आणि कार्यालयीन खर्चातंर्गत केवळ प्रलंबित असलेल्या वर्ग-४ च्या गणवेश खरेदीची (कापड व शिलाई) देयके अदा करण्यासाठी एकत्रित निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यांनी १७ बाबींशिवाय इतर देयकांसाठी त्या कार्यालयाचे अनुदान अथवा अन्य निधी शिल्लक असेल तरच ती देयके स्विकारावीत. तसेच जमा व खर्चाची मासिक विवरणे नवीन नमुन्यांत द्यावीत.

नियंत्रक
मफुकृवि, राहुरी

**सोबत :-** १. संदर्भिय दि.१८.०५.२०१८ रोजीचे परिपत्रक
२. वरील मुद्या क्र. २ नुसार कार्यालयांची यादी

प्रति,

१. योजना प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी, (सर्व), मफुकृवि, राहुरी.
२. अधिदान व लेखाधिकारी, मफुकृवि, राहुरी/ पुणे/ धुळे/ कोल्हापूर
३. अतिरिक्त अधिदान व लेखाधिकारी, मफुकृवि, राहुरी

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर

१. मा. संचालक विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी
२. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी
३. मा. संचालक संशोधन, मफुकृवि, राहुरी
४. मा. कुलसचिव, मफुकृवि, राहुरी

प्रत : स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, मफुकृवि, राहुरी यांना माहितीसाठी

D:\kunal16\budget 2018-19\Noting.docx

महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी, ४१३७२२, जि.- अहमदनगर

फोन :- ०२४२६-२४३३७४ e-mail :- comptroller.mpkv@gov.in

नियंत्रक
अत्यंत महत्त्वाचे

जा.क्र.नियंत्रक/परित्रक/ ९०७ /२०१८
दि. ९८/०५/२०१८

# -: परिपत्रक :-

**विषय-** विद्यापीठ निधीचे आर्थिक वर्ष २०१८-१९ चे अंदाजपत्रक सादर करणे व देयके पारीत करणेबाबत..

**संदर्भ-** १. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मफुकृवि/लेखा शाखा-२/३२०/२०१७, दि.१७.०७.२०१७, आणि दि.२१.०८.२०१७
२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/परिपत्रक/२८७/२०१८, दि.१९.०३.२०१८
३. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/परिपत्रक/३०९/२०१८, दि.२१.०३.२०१८
४. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/परिपत्रक/३०२/२०१८, दि.०२.०४.२०१८

**अ) अधिदान व लेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :**

१. मागील आर्थिक वर्षाच्या सर्व शिल्लक अनुदान तरतूदी लेखासंहिता नियम २६.६(२) अनुषंगिक परिच्छेद V भाग-A(2) नुसार व्यपगत करण्यात येत आहेत, याची नोंद घ्यावी. त्यामुळे मागील वर्षातील शिल्लक तरतूदींतून देयके स्विकारु नयेत व खर्च नोंदवू नये.
२. महसूली उत्पन्न, फिरता निधी योजनेतील मागील आर्थिक वर्षात मंजूर होवून सादर झालेली (आक्षेपीत) अथवा सादर न झालेली देयके मागील वर्षाच्या मंजूरीच्या आधारे चालू आर्थिक वर्षातील नवीन तरतूदींच्या आधारे स्विकारावीत व अदा करावीत.
३. उपरोक्त संदर्भ क्र. ३ मधील प्रपत्र-अ मध्ये नमुद खालील अ.क्र. १ ते ६ अत्यावश्यक प्रदाने व यासह खालील अ.क्र. ७ ते १४ या बाबींवरील खर्चाची देयके या आर्थिक वर्षात तरतूद वितरित नसतांना आणि माहे जूलै, २०१८ पूर्वी खालील परिच्छेद अ (०४) प्रमाणे अंदाजपत्रक मंजूर होईल असे गृहीत धरुन स्विकारावीत व पारीत करावीत.

| Sl. No | Particulars | Item in Budget Statement (प्रपत्र-ब) |
|---|---|---|
| १ | वीज देयक | 5(A)(a)(i) |
| २ | दूरध्वनी देयक | 5(A)(a)(v) |
| ३ | पाणी देयक | 5(A)(a)(vii) |
| ४ | मालमत्ता कर | 5(A)(a)(iv) |
| ५ | शासकीय कर/शुल्क | 7(ii)(iii)(iv) |
| ६ | न्यायालयीन आदेशान्वये द्यावयाची देणी | 5(A)(a)(ii) |
| ७ | मजूरी | 2(A)(i)(ii)<br>2(B)(i)(ii) |

| Sl. No | Particulars | Item in Budget Statement (प्रपत्र-ब) |
|---|---|---|
| ८ | इंधन खर्च | 5(A)(b)(vi) |
| ९ | कार्यालयीन वाहने व इतर वाहने/ यंत्रसामुग्रीची दुरुस्ती व देखभाल | 5(b)(viii) & (ix) |
| १० | बहिस्थ परीक्षकांची देणी | 6(iii) |
| ११ | सर्व प्रकारचे विमा | 5(A)(a)(vi) |
| १२ | जाहिरात व प्रसिद्धी | 5(b)(ii) |
| १३ | विद्यार्थ्यांचा शुल्क परतावा | 8(c) |
| १४ | सर्व प्रकारचे वार्षिक दुरुस्ती-देखभाल करार | 12(ii) |

मजुरी वरील प्रदाने करतांना वार्षिक अंदाजित खर्चासाठी आवश्यकतेनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची व खर्चाचे भाग (तुकडे) न करता वार्षिक अंदाजित खर्चास एकत्रितपणे सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात आली आहे, याची पडताळणी करुनच देयके पारीत करावीत.

D:\kunal16\circulars.docx

क्र.मा.प.

४. विद्यापीठ लेखा संहिता प्रकरण ०५ नुसार आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्याकडील फिरता निधी (उत्पादन चाचणी निधीसह), स्वयंसहाय्यता योजना, विद्यार्थी कल्याण निधी, महसूली उत्पन्न निधीतून अपेक्षित अनुदानित कामे इत्यादी योजना/ मागण्यांचे अंदाजपत्रक विहीत कार्यपध्दतीन्वये मंजूर करुन घेईपर्यंत या निधीमधून वरील १४ प्रकारच्या प्रदानांशिवाय इतर देयके स्विकारु व अदा करण्यात येवू नयेत.

ब) कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही :-

**विद्यापीठ कायदा कलम २०(३) व Statute 67 नुसार अंदाजपत्रकामध्ये मंजूर नसलेले खर्च मान्य करता येणार नाहीत, याची कृपया नियंत्रण अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी.**

१. संदर्भ क्र. ०१ अन्वये अंदाजपत्रके तयार करण्यास सूचना देऊनही बहुतांशी कार्यालयांनी ती सादर केलेली नाहीत. त्यामुळे पुनःश्च मागणी करण्यात येत आहे.

२. सन २०१८-१९ या वर्षापासून अनुदान वाटप बाबनिहाय करण्यात येणार आहे. त्यानुसार सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी पूर्ण वर्षासाठी बाबनिहाय अपेक्षित जमा (जमेचे अंदापत्रक) व बाबनिहाय अनुदान मागणी, वरील परिच्छेद क्र. अ (०४) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सहाय्यक नियंत्रक (अंदाज शाखा) यांचेकडेस, सोबतच्या प्रपत्र अ व ब मध्ये (Excel Sheet मधील soft copy सह) दि. ३१.०५.२०१८ पूर्वी नोंदवावी.

जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकांची आवश्यकतेनुसार छाननी करणेस्तव आहरण व संवितरण अधिकारी निहाय बैठकांचे आयोजन माहे जून-२०१८ च्या पहिल्या आठवड्यात करण्यापासून येणार आहे

३. अनुदान मागणी करतांना सन २०१५-१६ ते २०१७-१८ या मागील तीन वर्षांमध्ये बाबनिहाय झालेली जमा/ झालेला खर्च विचारात घेण्यात यावा.

४. जेथे यापूर्वी या प्रपत्रांमध्ये नमुद बाबींनुसार जमा व खर्चाचे तपशील ठेवले नसतील तेथे जमा/ खर्चाच्या एकपेक्षा अधिक बाबींसाठीचा एकत्रित जमा/ खर्च महिरपी कंस करुन नमुद करावा. आवश्यकता वाटल्यास स्पष्टीकरणात्मक तपशील स्वतंत्र जोडपत्राव्दारे सोबत जोडावा.

*टिप : वरील ब (२) मध्ये नमुद Excel Formats च्या कोऱ्या नमुन्यांची Excel file "Detailed Comprehensive Receipts and Payment Budget for 2018-19" सोबत जोडली आहे. त्यामध्ये कुठलाही बदल न करता (Column/ Row च्या क्रमांक व संख्येत कमी/ जास्त न करता) त्याच नमुन्यात ac2mpkv@gmail.com यावर E-mail पाठवावा.*

**नियंत्रक**
**मफुकृवि, राहुरी**

प्रत : माहिती व अधिनस्त कार्यालयांना सूचना देणेस्तव सविनय सादर
१. मा. संचालक विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी
२. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी
३. मा. संचालक संशोधन, मफुकृवि, राहुरी
४. मा. कुलसचिव, मफुकृवि, राहुरी
५. विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी

प्रत : कार्यवाहीस्तव
१. योजना प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी, (सर्व), मफुकृवि, राहुरी.
२. अधिदान व लेखाधिकारी, मफुकृवि, राहुरी/ पुणे/ धुळे/ कोल्हापूर
२/- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद जमा व खर्च अंदाजपकांच्या प्रपत्रांमध्ये माहिती भरणेकामी आहरण व संवितरण अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करावे.
३. अतिरिक्त अधिदान व लेखाधिकारी, मफुकृवि, राहुरी
४. सहाय्यक नियंत्रक १ / २ / ३ / ४ मफुकृवि, राहुरी

प्रत : स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, मफुकृवि, राहुरी यांना माहितीसाठी

D:\kunal16\circulars.docx

सन २०१५-१६ या वर्षाचा वार्षिक ताळेबंद (Balance Sheet) व माहे मार्च २०१७ अखेरची भांडार पडताळणी प्राप्त कार्यालयांची यादी

## राहुरी विभाग

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | ताळेबंद | भांडार पडताळणी |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख,कृषी अर्थशास्त्र विभाग,मफुकृवि, राहुरी. | प्राप्त | प्राप्त |
| २ | प्रमुख,उद्यानविद्या विभाग,मफुकृवि, राहुरी. | प्राप्त | प्राप्त |
| ३ | प्रमुख, कृषी किटकशास्त्र विभाग,मफुकृवि, राहुरी. | प्राप्त | प्राप्त |
| ४ | प्रमुख शास्त्रज्ञ, कडधान्य सुधार प्रकल्प, मफुकृवि, राहुरी. | प्राप्त | प्राप्त |
| ५ | वरीष्ठ ज्वारी पैदासकार, ज्वारी सुधार प्रकल्प, मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| ६ | प्रभारी अधिकारी वनशेती संशोधन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| ७ | रोप पैदासकार, क्षमता असलेल्या पिकावरील अ.भा.स. प्रकल्प, मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| ८ | डॉ.अ.शिं.कृ.अ.व तं.महाविद्यालय,मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| ९ | प्रमुख, वनस्पतीरोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग,मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| १० | प्रभारी अधिकारी, चारा पैदासकार , गवत संशोधन योजना,मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| ११ | प्रमुख शास्त्रज्ञ, जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| १२ | प्रमुख, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग,मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| १३ | प्रमुख, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभाग,मफुकृवि, राहुरी./प्रमुख शास्त्रज्ञ, गो-संशोधन व विकास प्रकल्प, मफुकृवि, राहुरू | प्राप्त | प्राप्त |
| १४ | प्रमुख, आंतरविद्या शाखा, जलसिंचन व्यवस्थापन विभाग, मफुकृवि, राहुरी | प्राप्त | प्राप्त |
| १५ | प्रमुख,विस्तार शिक्षण विभाग,मफुकृवि, राहुरी. | प्राप्त | प्राप्त |
| १६ | प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र,सावळीविहीर,जि.अहमदनगर. | प्राप्त | प्राप्त |

## पुणे विभाग

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | ताळेबंद | भांडार पडताळणी |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी अधिकारी, भात रोगशास्त्र, कृषी संशोधन केंद्र, लोणावळा, जि. पुणे. | प्राप्त | प्राप्त |
| २ | प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, कडधान्य, तेलबिया, पीक संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपुर. | प्राप्त | प्राप्त |
| ३ | अखिल भारतीय समन्वयीत करडई संशोधन प्रकल्प, सोलापूर. | प्राप्त | प्राप्त |
| ४ | सहयोगी संशोधन संचालक, रा.कृ.सं.प्र., गणेशखिंड, पुणे | प्राप्त | प्राप्त |
| ५ | प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, मोहोळ | प्राप्त | प्राप्त |
| ६ | सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, पुणे | प्राप्त | प्राप्त |
| ७ | सहयोगी संशोधन संचालक, रा.कृ.सं.प्र. व मृद विशेषज्ञ, सोलापूर | प्राप्त | प्राप्त |

## कोल्हापूर विभाग

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | ताळेबंद | भांडार पडताळणी |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, राधानगरी, जि.कोल्हापूर. | प्राप्त | प्राप्त |
| २ | प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, कराड, जि. सातारा. | प्राप्त | प्राप्त |
| ३ | कृषी विद्यावेत्ता प्रादेशिक ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर | प्राप्त | प्राप्त |
| ४ | प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, सांगली | प्राप्त | प्राप्त |
| ५ | प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, कसबे डिग्रज, ता.मिरज, जि. सांगली. | प्राप्त | प्राप्त |
| ६ | प्राचार्य, कृषि तंत्र महाविद्यालय, कोल्हापूर | प्राप्त | प्राप्त |
| ७ | कृषी विद्यावेत्ता, कृषी संशोधन केंद्र, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | प्राप्त | प्राप्त |

## धुळे विभाग

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | ताळेबंद | भांडार पडताळणी |
|---|---|---|---|
| १ | सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर | प्राप्त | प्राप्त |
| २ | प्रभारी अधिकारी,डाळिंब संशोधन व तंत्रज्ञान प्रसारण केंद्र,लखमापुर, ता.बागलाण्, जि.नाशिक. | प्राप्त | प्राप्त |
| ३ | उद्यानविद्यावेत्ता, केळी संशोधन प्रकल्प, जळगाव | प्राप्त | प्राप्त |
| ४ | विस्तार कृषी विद्यावेत्ता, विभागीय विस्तार केंद्र, धुळे | प्राप्त | प्राप्त |
| ५ | प्रभारी अधिकारी, कांदा व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगांव बसवंत | प्राप्त | प्राप्त |
| ६ | प्रमुख शास्त्रज्ञ, तेलबिया संशोधन केंद्र, जळगांव | प्राप्त | प्राप्त |
| ७ | सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, नंदुरबार | प्राप्त | प्राप्त |

सहाय्यक नियंत्रक (३)
महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी-४१३ ७२२, जि. अहमदनगर